# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल केलेले द्वितीय अपिल क्र.रामाआ नाशिक/द्वितीय अपिल क्र.२१४६/२०२०/धुळे मधील शास्तीचे प्रकरण**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री.दिलीप तुकाराम निकम, रा. लक्ष्मीछाया अपार्टमेन्ट, फ्लॅट नं.११, शिवाजी चौक, पाथरवट लेन, पंचवटी, नाशिक ४२२ ००३. | कार्यालय अधीक्षक, पोलीस अधीक्षक धुळे यांचे कार्यालय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, साक्री रोड, धुळे ता.जि.धुळे. | अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक धुळे यांचे कार्यालय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, साक्री रोड, धुळे ता.जि.धुळे. |

## विवेचन

उपरोक्त द्वितीय अपिल संदर्भात अपिलार्थी यांनी दिनांक १०/०७/२०२० रोजीच्या माहिती अर्जान्वये आपल्या कार्यालयातील रविंद्र डी.सोनवणे या कार्यालयातील मा.जन माहिती अधिकारी व डॉ.एम.राजकुमार, एस.पी. अभिषेक पाटील, एपीआय मोहाडी पोलीस ठाणे ता.जि.धुळे या अधिका-यांविरुध्द नाशिक जिल्हा सत्र न्यायालयात फौजदारी केस संबंधातील न्यायालयातील समन्स पाठवण्यासाठी शासकीय सेवा करणा-या सध्या कार्यरत असलेल्या कार्यालयाचा संपूर्ण पत्ता, कर्मचा-यांची संपूर्ण नाव, वय, कायमस्वरुपी निवासाचा संपूर्ण पत्ता यासह संपूर्ण माहिती मला मा.न्यायालयीन कामकाजासाठी २४ तासात देण्यात यावी अशी मागितली होती. सदर माहिती अर्जाच्या संदर्भात दाखल उपरोक्त द्वितीय अपिलामध्ये आयोगाने दिनांक २०/०६/२०२२ रोजी सुनावणीअंती खालीलप्रमाणे आदेश पारित केले होते.

१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, धुळे यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आंत अपिलार्थीस त्यांच्या दि.१०/०७/२०२० रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध अचूक माहिती नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामूल्य पुरवावी.

२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, धुळे यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २०(१) अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा आदेश प्राप्तीच्या ७ दिवसांचे आत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

३) तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, धुळे यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र.केंमाअर्ज २००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१/०३/२००८ नुसार कार्यवाही प्रस्तावित का करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा आदेश प्राप्तीच्या ७ दिवसांचे आंत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहित धरुन शासन परिपत्रक दि.३१/०३/२००८ नुसार कार्यवाही प्रस्तावित करण्याबाबतचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

४) पोलीस अधीक्षक, धुळे यांना सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१५/प्र.क्र.२२२/१५/सहा, दि.०१/१२/२०१५ नुसार असे आदेश देण्यात येत आहे की, याप्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता तत्कालीन जन माहिती अधिकारी द्वितीय अपिल सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांच्याविरुध्द उपरोक्त परिपत्रकानुसार कार्यवाही करण्यात येवून त्याबाबतचा अहवाल आयोगास सादर करावा.

२. सदर आदेशास अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, धुळे यांनी आयोगाकडे कोणताही लेखी खुलासा सादर केल्याचे दिसून येत नाही. आयोगाने सदर द्वितीय

अपिल प्रकरणी पारित केलेल्या निर्णयात असे स्पष्ट नमूद केले आहे की, अपिलार्थी यांच्या दि.१०/०७/२०२० रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.२७/०७/२०२० रोजीच्या पत्रान्वये माहिती पुरविल्याचे दिसून येते. अपिलार्थी यांनी त्यांना चुकीची व दिशाभूल करणारी माहिती पुरविली असे द्वितीय अपिल दाखल करतांना नमूद केले आहे. तसेच त्यांचे सदर सुनावणीच्या अनुषंगाने लेखी निवेदन सादर केले असून सदर निवेदनात संबंधितांनी जाणुनबुजून माहिती दिली नाही तसेच प्रथम अपिल सुनावणी विलंबाने घेतल्याचे नमूद केले आहे. यावरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपूर्ण माहिती पुरविल्याचे स्पष्ट होते.

तथापि आयोगाकडे उपलब्ध असलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, धुळे यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि.१०/०७/२०२० रोजीच्या माहिती अर्जास अनुसरुन दि.२७/०७/२०२० च्या पत्रान्वये जी एक पानांची माहिती उपलब्ध करुन दिली आहे त्यामध्ये अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या अधिका-यांचे नाव, वय, हुद्दा, कार्यरत असलेल्या कार्यालयाचा पत्ता, निवासाचा पत्ता इ. उपलब्ध असलेली माहिती पुरविली असल्याचे दिसून येते. तसेच अपिलार्थी यांनी माहिती अर्जात त्यांचा जो ई-मेल नमूद केलेला आहे त्या ई-मेल वर देखील माहिती पाठविल्याचे दिसून येते. अपिलार्थी यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपिलामध्ये दिलेली माहिती चुकीची, अपूर्ण आहे, सदरचा अर्ज वर्ग करणे बंधनकारक असतांना ही वर्ग केलेला नाही व मुदतीत माहिती दिलेली नाही व सदरचे अपिल ही मुदतीत चालविलेले नाही अशी कारणे नमूद केलेली आहेत. तथापि अपिलार्थी हे प्रथम अपिल सुनावणीवेळी तसेच द्वितीय अपिल सुनावणीवेळी देखील अनुपस्थित असून कोणती माहिती चुकीची व अपूर्ण मिळाली याचा उलगडा झालेला नाही. त्यामुळे आयोगाच्या आदेशानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, धुळे यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २०(१) अन्वये शास्तीची कार्यवाही करण्याचा प्रश्न राहत नाही.

३. आयोगाच्या उपरोक्त आदेशानुसार तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगाकडे कोणताही खुलासा सादर केल्याचे दिसून येत नाही.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, धुळे यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि.१०/०७/२०२० रोजीच्या माहिती अर्जास अनुसरुन विहित मुदतीत दि.२७/०७/२०२० च्या पत्रान्वये तसेच ई-मेल द्वारे देखील उपलब्ध असलेली माहिती पुरविली असल्याने त्यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) अन्वये प्रस्तावित केलेली शास्तीची कार्यवाही रद्द करण्यात येत आहे.

२) पोलीस अधीक्षक, धुळे यांना आदेशित करण्यात येते की, अपिलार्थी यांच्या दि.१४/०८/२०२० रोजीच्या प्रथम अपिलाच्या अनुषंगाने तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी विहित मुदतीत सुनावणी न घेवून, आदेश पारीत न करुन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(६) तसेच शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्र.केंमाअर्ज २००७/११८२/प्र.क्र.६५/०७/६ (मा.अ.) दि.१२/१२/२००७ मधील तरतुदींचे उल्लंघन केलेले असल्याची खातरजमा झाल्यास त्यांच्याविरुध्द शासन परिपत्रक क्र.केंमाअर्ज २००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१/०३/२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

३) प्रस्तुत द्वितीय अपिल अंतिमत: निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

( भूपेन्द्र गुरव )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

स्थळ :- नाशिक
दिनांक :- 26/08/2025

---

प्रत :- माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक यांचे कार्यालय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, साक्री रोड, धुळे ता.जि.धुळे.

---

जावक क्र. ६५८०६ दिनांक :- 28 AUG 2025